# पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.

---

<u>प्रेसनोट</u>

## ‘ड्रायव्हर्स डे’ निमित्त पीएमपीएमएल कडून ड्रायव्हर सेवकांचा सन्मान

- **‘ड्रायव्हर्स डे’ निमित्त परिवहन महामंडळाकडून १९ चालकांचा सन्मान.**

‘ड्रायव्हर्स डे’ निमित्त उत्कृष्ट सेवा देणाऱ्या पीएमपीएमएल च्या ड्रायव्हर सेवकांचा सन्मान पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालिका मा. दिपा मुधोळ - मुंडे यांचे हस्ते व सहव्यवस्थापकीय संचालक मा. श्री. नितीन नार्वेकर व मुख्य कार्यकारी अधिकारी मा. प्रज्ञा पवार - पोतदार यांच्या प्रमुख उपस्थितीत मुख्य प्रशासकीय इमारतीत असणाऱ्या ट्रेनिंग हॉलमध्ये शुक्रवार, दि. २४ जानेवारी २०२५ रोजी करण्यात आला. यावेळी सर्व खाते प्रमुख, विभाग प्रमुख व सत्कारमूर्ती ड्रायव्हर यांचे कुटुंबातील सदस्य उपस्थित होते.

विना अपघात सेवा देणाऱ्या १९ ड्रायव्हर सेवकांचा सन्मान मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन त्यांच्या कुटुंबासोबत यावेळी करण्यात आला. १५ डेपोतून परिवहन महामंडळाकडील व खासगी ठेकेदाराकडील १९ ड्रायव्हर सेवकांची निवड यासाठी करण्यात आली होती.

या वेळी बोलताना महामंडळाच्या अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालिका मा. दिपा मुधोळ - मुंडे म्हणाल्या कि, ड्रायव्हर सेवकांनी बस चालविताना आपण कुटुंबातील लोकांची खूप चांगल्या पद्धतीने काळजी घेतो हीच मानसिकता आपण बसच्या बाहेर असलेले इतर वाहनधारक व पादचारी तसेच बस मध्ये असलेले सर्व प्रवाशी आपलेच आहेत ही मानसिकता आपण सगळयाबद्दल ठेवली तर दुर्घटना होणार नाहीत. यापुढे दुर्घटना विरहित सेवा देण्याचा प्रयत्न राहणार असून ड्रायव्हर सेवकांचे मनोबल वाढविले तरच परिवहन महामंडळाची प्रतिमा उंचावणार आहे. परिवहन महामंडळाकडील ड्रायव्हर सेवकांचे मनोबल वाढविण्यासाठी प्रशिक्षण देण्याबरोबर मोटिव्हेशनही देण्यात येत आहे असे त्या म्हणाल्या.

याकार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि आभार परिवहन महामंडळाचे चिफ ट्रान्सपोर्ट मॅनेजर (ऑपरेशन) मा. सतिश गव्हाणे यांनी मानले.

---

## पुणे महानगर परिवहन महामंडळाकडून अपघात विरहीत सेवा देणेसाठी विविध उपक्रम.

- ‘ड्रायव्हर्स डे’ निमित्त परिवहन महामंडळाच्या मुख्य बसस्थानकावर आगार व्यवस्थापक व प्रवासी यांचेकडून ड्रायव्हर सेवकांचा पुष्पगुच्छ देऊन सन्मान करणेत आला.

- दि. २० जानेवारी २०२५ ते दि. २७ जानेवारी २०२५ याकालावधीत ‘अपघात विरहित सप्ताह’ राबविण्यात आला आहे.
- IDTR (CIRT) यांचेकडून गेल्या महिनाभरापासून परिवहन महामंडळाकडील व खासगी ठेकेदाराकडील दररोज ५० ड्रायव्हर सेवकांना प्रशिक्षण देण्यात येत असून आजपर्यंत ६०० ड्रायव्हर सेवकांना प्रशिक्षण देण्यात आले आहे.
- परिवहन महामंडळाच्या स्कूल बसेस ज्या शाळेमध्ये आहेत त्या शाळेमध्ये ‘ड्रायव्हर्स डे’ निमित्त ‘चित्रकला’ व ‘निबंध’ स्पर्धा घेऊन विशेष प्राविण्य मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचा सन्मान परिवहन महामंडळाकडून करण्यात आला आहे.

वरील सर्व उपक्रम पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक मा. दिपा मुधोळ मुंडे यांच्या संकल्पनेतून करण्यात आले आहेत.

Sd/-
**चिफ ट्रान्सपोर्ट मॅनेजर (ऑपरेशन)**
**पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.**

---

दि. २४/०१/२०२५.

मा. संपादक,
दैनिक .........
यांजकडेस...

महोदय,

वरील प्रेसनोट नागरिकांच्या माहितीसाठी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिद्ध होणेविषयी विनंती आहे.
मा. स. कळावे.

Sd/-
**कामगार व जनता संपर्क अधिकारी**
**पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.**

---